# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
# (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :—
२५६०१२६६
२५६०१२७२
e-mail : dyrelg@unipune.ac.in

शैक्षणिक पात्रता विभाग
गणेशखिंड, पुणे— ४११००७

---

संदर्भ क्रमांक शै. पा./222    दिनांक - 24/08/2018

प्रति,
मा. प्राचार्य/ संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय - प्रवेशित विद्यार्थ्यांकडून स्थानांतर प्रमाणपत्र विहित मुदतीत घेणेबाबत.....**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक पात्रता परिपत्रक क्रमांक १००/२०१८ मधील मुद्दा क्रमांक ३८ नुसार, एखादा विद्यार्थी कोणत्याही अभ्यासक्रमात एक किंवा अधिक विषय अनुत्तीर्ण असेल आणि त्यानंतर त्याने दुस-या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असेल तर त्यास पूर्वीच्या अभ्यासक्रमातील अनुत्तीर्ण विषयांची परीक्षा देता येणार नाही, म्हणजेच एकाच वेळी दोन अभ्यासक्रम पूर्ण करता येणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. उदा. एखादा विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ या शैक्षणिक वर्षात एम. ए. अभ्यासक्रमातील काही किंवा सर्व विषय अनुत्तीर्ण असेल आणि त्याने पदवी अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक पात्रतेवर बी. एड. अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यानंतर त्यास एम. ए. अभ्यासक्रमाच्या अनुत्तीर्ण विषयांची परीक्षा देता येणार नाही.

उपरोक्त गैरप्रकार होऊ नयेत यासाठी सर्व महाविद्यालयांतील प्राचार्यांनी, कोणत्याही अभ्यासक्रमास विद्यार्थ्याने प्रवेश घेतल्यानंतर सदर विद्यार्थ्याचे पूर्वीच्या महाविद्यालयांतील स्थानांतर प्रमाणपत्र (Leaving Certificate/ Transfer Certificate) ३० दिवसांच्या आत जमा करण्याबाबत सक्ती करण्यात यावी.

तरी आपणांस विनंती करण्यात येते की, उपरोक्तबाबत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

कळावे,

आपला,

उपकुलसचिव
शैक्षणिक पात्रता विभाग

Zagade/Desktop/Recent Letters/Letter Marathi.doc